महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
विभागीय मंडळ, पुणे.४११००५

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY & HIGHER SECONDARY EDUCATION, PUNE.411005

| DIVISIONAL CHAIRMAN | DIVISIONAL SECRETARY | E-MAIL - |
|---|---|---|
| 25536722 (OFFICE) | 25536781/82/83, 25536712 (OFFICE) | sscboardpune@gmail.com |


क्र.पु.वि.मं./शाखा-डीपी./ 7889
पुणे. 411005.
दि. 29/9/2025

प्रति,
सर्व मुख्याध्यापक / प्राचार्य
इ. 10 वी व इ. 12 वी परीक्षा केंद्र
जिल्हा पुणे, अहिल्यानगर व सोलापूर.

**विषय :- इ. १० वी व इ. १२ वी परीक्षा केंद्रांवरील भौतिक सुविधेबाबत...**
**संदर्भ :- मा. रा.मं कार्यालयाचे पत्र क्र.रा.मं/परीक्षा-८/३२६९, दि. २५.०९.२०२५**

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, संदर्भिय पत्रान्वये फेब्रुवारी-मार्च 2026 मध्ये घेण्यात येणाऱ्या इ. 10 वी व इ. 12 वी परीक्षेच्या सर्व परीक्षा केंद्रांवर खालीलप्रमाणे भौतिक सुविधा असणे आवश्यक आहे.

१. परीक्षा केंद्र परिसरात व परीक्षेशी संबंधित सर्व वर्ग खोल्यांमध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमेरे असणे अत्यावश्यक आहे.
२. परीक्षा केंद्राच्या सर्व बाजूने पक्की संरक्षक भिंत (Wall Compound) असावी.
३. प्रत्येक परीक्षार्थ्यास एक याप्रमाणे केंद्रावर समाविष्ट विद्यार्थी संख्येनूसार पुरेसे बाक (Bench) / फर्निचर सुस्थितीत असावे.
४. परीक्षा केंद्राच्या इमारतीच्या खिडक्यांना पक्क्या जाळया असाव्यात.
५. परीक्षा केंद्रावर मुलामुलींसाठी स्वतंत्र, पक्की व विद्यार्थी संख्येनूसार पुरेशी स्वच्छतागृहे / प्रसाधनगृहे असावीत. सदर स्वच्छतागृहात मुबलक पाणी पुरवठा असावा.

सर्व परीक्षा केंद्रांवर उपरोक्तप्रमाणे भौतिक सुविधा असणे अनिवार्य आहे. ज्या परीक्षा केंद्रांवर उपरोक्त भौतिक सुविधा नसतील तर अशी परीक्षा केंद्र बंद करण्यात येईल तसेच नवीन परीक्षा केंद्रांना उपरोक्त भौतिक सुविधा नसल्यास केंद्र मान्यता देण्यात येणार नाही.

तरी सर्व परीक्षा केंद्रांनी भौतिक सुविधेची माहिती फोटो व गुगल लोकेशनसह तसेच या पत्रासोबत देण्यात आलेल्या नमून्यात हमीपत्र गटशिक्षणाधिकारी यांचे स्वाक्षरी व शिक्क्यासह सादर करावे.

सोबत-
भौतिक सुविधेबाबतचे हमीपत्र.

**(डॉ. कैलास दातखीळ),**
**विभागीय सचिव,**
**महा. राज्य माध्य. व उच्च माध्य. शिक्षण मंडळ,**
**पुणे विभागीय मंडळ, पुणे-05.**

प्रत माहिती व पुढील कार्यवाहीस्तव-
1. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प. पुणे, अहिल्यानगर व सोलापूर.
2. सर्व गटशिक्षणाधिकारी जिल्हा पुणे, अहिल्यानगर व सोलापूर.

# भौतिक सुविधा हमीपत्र

परीक्षा केंद्र क्रमांक............... केंद्राचे नाव.............................................................................................................

| अ.क्र | भौतिक सुविधा | शेरा |
|---|---|---|
| १. | परीक्षा केंद्र परिसरात व परीक्षेशी संबंधित सर्व वर्गखोल्यांमध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमेरे आहे/नाही. | |
| २. | परीक्षा केंद्राच्या सर्व बाजूने पक्की संरक्षक भिंत (Wall Compound) आहे/नाही | |
| ३. | प्रत्येक परीक्षार्थ्यास एक याप्रमाणे केंद्रावर समाविष्ट विद्यार्थी संख्येनूसार पुरेसे बाक (Bench) / फर्निचर सुस्थितीत आहे/नाही | |
| ४. | परीक्षा केंद्राच्या इमारतीच्या खिडक्यांना पक्क्या जाळया आहे/नाही. | |
| ५. | परीक्षा केंद्रावर मुलामुलींसाठी स्वतंत्र व विद्यार्थी संख्येनूसार पुरेशी स्वच्छतागृहे/प्रसाधनगृहे व सदर स्वच्छतागृहात मुबलक पाणी पुरवठा आहे/नाही. | |

उपरोक्तप्रमाणे सर्व भौतिक सुविधा केंद्र क्रमांक................वर उपलब्ध आहे. याबाबत हमीपत्र देण्यात येत आहे.

उपरोक्त माहिती खोटी अथवा चूकीची आढळल्यास आमचे परीक्षा केंद्र रद्द करण्यास आमची कोणतीही हरकत नाही.

**मुख्याध्यापक / प्राचार्य** **गटशिक्षणाधिकारी**